UGC Approved Journal
Sr. No. 64310

ISSN 2319-8648

Indexed (IIJIF)

Impact Factor - 2.143

# Current Global Reviewer

UGC Approved International Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

Editor in Chief
Mr.Arun B, Godam

www.rjournals.co.in

(1) May / oct - 2017

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *

CURRENT GLOBAL REVIEWER

Half Yearly | UGC Approved | ISSN : 2319 - 8648
Issue IX Vol II , May 2017 | Sr. No. 64310 | Impact Factor : 2.143

# कुषाण काळातील स्त्रि-पुरुषांची वस्त्रशैली

प्रा.डॉ.सुनेवार किशन रामलू
(इतिहास विभाग प्रमुख) देगलूर महाविद्यालय देगलूर,ता.देगलूर जि.नांदेड
--------------(29)---------------------- Dept. of History----------------------------------------

अनादी काळात मानव प्राणी गुहांमध्ये व टोळीरुपात राहत होता. त्यावेळी तो नैसर्गिक अवस्थेत राहत होता. शिकार करुन कच्चे मांस, झाडपाला, फुले, फळे, कंदमुळे खाऊन आपली उपजिविका चालवित होता. त्यानंतर हजारो वर्षांनी माणुस शेती करायला शिकला त्याला नवनवीन ज्ञानाचा बोध होतच राहीला. त्याचाच एक भाग म्हणजे अनादी काळातील मानव थंडी-उन यांच्यापासून संरक्षण व्हावे म्हणून आणि लज्जा आच्छादनाच्या उद्देशाने झाडांची पाने, झाडांची साल, प्राण्यांची कातडी इत्यादींचा वापर करुन आपले अंग झाकुण घेवू लागला. त्यानंतर आणखी पुढे हजारो वर्षानंतर मानवाने कापड बनविण्याची कला अवगत केली. आणि हळू हळू त्या कापडांना रंगविने, अलंकृत करणे इत्यादी शिकला. त्या कापडाचे शिवणकाम करु लागला. त्यांची वस्त्रे बनवू लागला. अनेक आकार-प्रकारची वस्त्रे बनवू लागला. त्या वस्त्रांच्या अनेक शैली तत्कालीन इतिहासकाळात पहावयास मिळतात. त्याचप्रमाणे कुषाणकाळात तत्कालीन स्त्रि-पुरुषांची वस्त्र शैली कशी होती. याची माहिती पुढीलप्रमाणे सांगता येते.

**कुषाणकालीन वस्त्रशैली**

कुषाण काळातच गांधार कला शैली आणि मथूरा कलाशैलींचा विकास झाला. गांधार शैलीवर पार्शियन, ग्रीक, शक, रोमन आणि कुषाण यांच्या कलांचा प्रभाव दिसतो. म्हणून त्या - त्या देशांतील लोकांच्या वस्त्रशैलींचा अविष्कार कुषाणकालीन मुर्तीकलेवर झाला. म्हणून कुषाणकालीन वस्त्रशैली वैशिष्ट्यपुर्ण मानली जाते. कुषाणकालीन गांधार कला व मथूरा कला अंतर्गत गौतमबुध्दाच्या तसेच तत्कालीन राजा व देवीदेवतांच्या व इतर ज्या काही मुर्ती किंवा शिल्पे तयार झाली. त्याआधारे तत्कालीन लोकांची वेशभुषा किंवा वस्त्रशैली कशी होती हे सविस्तर सांगता येते.[१] गांधार, मथुरा, संघोल, अमरावती, नागार्जुन कोंडा आणि गोल्ली येथील मुर्तीवरून स्पष्ट दिसते की, कुषाणकाळात धोती, साडी, उष्णीष यासारखी वस्त्रे परिधान करण्याची प्रथा होती. पण त्यांच्या परिधानाच्या शैली मात्र भिन्न - भिन्न होत्या. भारताच्या वायव्येकडील भागात तत्काळात भारतीय वेशभुषांशिवाय कंचुक, सलवार, टोपी यासारखी विदेशी प्रचलनाची वस्त्रे परिधान केली जात होती. कुषाणकालीन वस्त्रशैलीवरून स्पष्ट होते की, भारताचे युनान, मध्य आशिया, आणि इराणशी सांस्कृतीक व व्यापारी संबंध होते. कुषाणकालीन गांधार कलेत जी स्त्री - पुरूष शिल्पे आहेत. त्यातून ग्रीक स्त्रि - पुरूषांची तत्कालीन वेशभुषा कशी होती हे स्पष्टपणे दिसते कुषाणकाळात जी नाणी चलनात होती त्यावरही कुषाण राजांच्या प्रतिमा, विविध देवीदेवतांच्या प्रतिमा अंकीत होत्या, त्यावरूनही तत्कालीन वस्त्रशैली कळते तत्कालीन उत्तर भारतीय लोकांच्या तुलनेत दक्षीण भारतीय स्त्री - पुरूषांची वस्त्रशैली अगदी साधी होती. दक्षीण भारतीय लोक केवळ मलमलची धोती आणि कमरबन्ध धारण करीत होते. फक्त योध्दा, शिकारी आणि द्वारपालच कंचुक परिधान करीत होते. कुषाणकाळत सुती, रेशमी आणि लोकरी वस्त्रे परिधान करण्याचे प्रचलन होते. तुलनात्मकदृष्ट्या पाहिल्यास सुती कापडाचा वापर सर्वात जास्त प्रमाणावर केला जात होता. 'अंगविज्जा' ग्रंथानुसार तत्काळात कापसाच्या उत्पादनाचेही उल्लेख सापडतात त्याकाळात उत्तम प्रतिचे कापूस पिकविले जात होते. त्या कापसाचे उत्तम असे धागे निघत होते.[२] त्यावेळी सुताचा व्यापार करणाऱ्या व्यापाऱ्यांना 'सुत्तवाणिय' म्हणत होते तर रेशमाचा व्यापार करणाच्या व्यापाऱ्यांना 'कोपकार' किंवा 'कोस्सजवायक' असे म्हटले जात होते.[३] सुती वस्त्रांना 'अण्डज' किंवा 'सव्वकपासिक' म्हटले जात होते तर रेशमी वस्त्रांना 'पोण्डज' म्हटले जात होते. हे अन्डज व पोन्डज कापड उत्तम दर्जाचे मानले जात होते.[४] तसेच तत्कालीन रेशमी वस्त्रांना पट्टांशुक, चीत्र, कौषेय, धौतपट्ट या नावानेही ओळखले जात होते. लोकरी वस्त्रांना कम्बळ म्हटले जात होते. तसे 'दुश्य', 'उण्णीक' ह्या शब्दांचाही वापर केला जात होता. लोकरी वस्त्रे बनविणाऱ्या लोकांना 'दियन्डकंबलवायक' म्हणत होते तर लोकरी कपड्याच्या व्यापाऱ्यांना 'उण्णवाणिय' असे म्हटले जात होते.[५]

कुषाणकाळात क्षोम, शाण, दुकुल, पांडूदुकुल, हर्यणी, पणपट्ट, चिण्णपट्ट, आपरान्तक, फलक, फुट्टक आणि पुष्पपट्ट इत्यादी नावाची वस्त्रेही होती. यातील क्षोम, दुकुल, चिण्ण्पट्ट ही रेशमी वस्त्रे होती.[६] तत्कालीन भिक्षुक गण ऋषीमुनी लोक झाडांच्या सालीचे (वल्कल) वस्त्र, उंट, मेंढी, व मनुष्यांच्या केसापासून (जावळ) निर्माण केलेले कंम्बळ वापरत होते. झाडांच्या

**CURRENT GLOBAL REVIEWER**
Half Yearly | UGC Approved | ISSN : 2319 - 8648
Issue IX Vol II , May 2017 | Sr. No. 64310 | Impact Factor : 2.143

सालीपासून वस्त्र बनविणाऱ्यांना 'वाग' असे म्हटले जात होते.[७] 'अंगविज्जा' ग्रंथात विविध धातूची वस्त्रे बनविली जात होती. असा उल्लेख आलेला आहे. त्यात लौहजालीक, सुवर्णपट्ट, सुवर्ण - क्षमित, वरखचियं इत्यादी वस्त्रे धातूची वस्त्रे होती. शिवाय वस्त्रांच्या किनार ह्या अलंकृत बनविल्या जात होत्या. त्यांच्यासाठी 'सकलदसद' व 'छिन्नदास' असे शब्दप्रयोग वापरले जात होते. शिवणकाम केलेल्या वस्त्रांचाही उल्लेख सापडतो ती वस्त्रे पांढरी, लाल, पिवळी, हिरवी, मोरपंखी रंगाची, गडद स्लेटी, दुहेरी रंगाची, (धुपछाय) गुलाबी रंगाची होती. म्हणजे तत्कालीन लोक रंगीबिरंगी वस्त्रे वापरीत होते. कपडे रंगविणाऱ्या लोकांना 'शुध्दरजक' असे संबोधले जात होते.[८]

कुषाणांच्या समकाळात ज्या ग्रंथांची रचना झाली त्यातूनही तत्कालीन वस्त्रशैलीची व वस्त्रप्रकारांची बरीच माहिती मिळते. साधारणतः तत्कालीन लोक धोती नेसत व शाल परिधान करीत होते. शालीने दोन कांधे झाकत होते. अश्वघोषने आपल्या 'सौंदरनन्दकाव्य' ग्रंथात म्हटले की, तत्कालीन लोक वस्त्र आणि आभूषणांनी सजत होते. शिरोवस्त्र धारण करत होते त्याला 'मौली' असे नाव होते.[९] 'दिव्यावदान' ग्रंथात यमली, दुन्दचेल या वस्त्रांचा उल्लेख आहे. त्याचबरोबर 'सणसाती' (पेटीकोट) व 'प्रावार' वस्त्रांचाही उल्लेख आहे. तत्कालीन पुरूष मंडळी किनार असलेली विशेष प्रकारची वस्त्रे वापरीत होते. त्याच्याने पुर्ण शरिर झाकून घेत होते. असे वस्त्र साधारणतः राजे लोक वापरत होते. [१०] 'अंगविज्जा' ग्रंथात 'उत्तरीज' व 'अन्तरिज' वस्त्रांचा उल्लेख आहे यातील उत्तरीज (उत्तरीय) हे नाभीच्या वर तर अन्तरीज (अंतरीय) हे नाभीच्या खाली नेसले जाणारे वस्त्र होते. पुरूष मंडळी 'पटशाटक' (रेशमी धोती), क्षोम, दुगुलीया (दुकूल) चिनान्शूक, चिनपट्ट, प्रावार, शटक (धोती), श्वेतशाट (पांढरी धोती,) कोषेयपारा (रेशमाची किनार असलेली धोती), पटा (चादर) उस्सीस (उष्णीष),वेष्पण (फेटयावरची पट्टी), कुपास (जॅकेट), कन्चुक, वारबाण (काहीसा वेगळी कंचुक), पल्लसाड्ग (लंगोट) इ. वस्त्रे परिधान करीत होते.[११] 'ललितविस्तार' ग्रंथानुसार त्याकाळात काशीमध्ये उत्पादीत झालेली वस्त्रे श्रेष्ठ मानली जात होती. उन्हाळयात गर्मीच्या काळात सुती वस्त्रे परिधान केले जात होते. तसेच शिवलेली वस्त्रेही नेसली जात होती. त्यात प्रमुख कंचुक होते. विशेषकरुन योध्दा लोक कन्चुक नेसत होते.[१२] तत्कालीन उत्तम प्रतिची सुती व रेशमी वस्त्रे उच्च वर्गातील स्त्रि-पुरुष वापरत होते. तशी वस्त्रे बाजारांमध्ये दुकानातही विकत घेता येत होती. तसेच तशीच उत्तम प्रतिची वस्त्रे परदेशातही निर्यात केली जात होती. त्यातील रेशमी वस्त्रांवर विविध रत्ने व मौल्यवान खड्यांचे व सोन्याचे, चांदीचे वर्क केलेले आढळतात, अशा वस्त्रांना 'रत्नसुवर्ण प्रचरक' असे म्हटले जात होते.[१३] 'सौंदरानन्दकाव्य' ग्रंथात उल्लेख आहे की तत्कालीन लोक स्वतःला वस्त्राभुषणांनी सजवित होते. तसेच प्रसंगानुसारही वस्त्रे परिधान केली जात होती. म्हणजे आनंदी प्रसंग आणि शोकाकुल प्रसंगानुसार वस्त्रे वापरली जात होती. तत्कालीन लोक शोक प्रसंगाच्या समयी विशेषकरून गेरू रंगाची वस्त्रे परिधान करीत होते. एरव्ही कोणत्याही रंगाची वस्त्रे परिधान केले जात होते. व त्या वस्त्रांना विविध सुगंधी द्रव लावून सुवासिक बनवून हौसेने परिधान करीत होते.[१४]

वरील कुषाणकालीन वस्त्रे तत्कालीन लोक आपापल्या आर्थिक परिस्थीनुसार व आवडीनुसार वापरत होते. ते लोक विभीन्न रंगांची व तसेच शिवलेली वस्त्रेही वापरीत होते. तत्कालीन लोक धोती, शाल, उष्णीष ही वस्त्रे भिन्न - भिन्न शैलींनी परिधान करीत होते. त्या लोकांच्या धोतीची गाठ ही आकाराने मोठी असल्याचे दिसते. त्यावरून ती धोती अलंकृत असल्याकारणाने वजनदार असावी किंवा आकाराने लांब व रूंद असावी असे म्हणता येते. 'नाटयशास्त्र' ग्रंथानुसार तत्कालीन लोक उष्णीष वापरत होते. पण ही उष्णीष उच्चवर्गीय लोकच जास्त करुन वापरत होते.[१५] 'अंगविज्जा' ग्रथांत उष्णीषला जालक, पट्टीका, वेढुण (वेष्टण), सिसकरण इत्यादी नावानेही संबोधले आहे.[१६]

**स्त्रियांची वस्त्रशैली**

कुषाणकाळात स्त्रिया पायांच्या टाचेपर्यंत लांब पोहोचणारी साडी नेसत होत्या आणि मनगटापर्यंत लांब अशी कंचुक परिधान करीत होत्या. तसेच दोन्ही खांदे झाकून पून्हा टाचेपर्यंत लटकणारी उत्तरीय धारण करीत होत्या. कधी - कधी उत्तरीयचे एक टोक कमरेंतही खोसत होत्या. तर कधी त्या लांब सोडलेल्या उत्तरीयला कमरपट्याच्या आत बांधत होत्या. व उत्तरीयचा कमरेभावती फूगा बनवत होत्या [१७] गांधार कलेतील स्त्रि मुर्त्यांमध्ये साडी नेसण्याच्या विभीन्न शैली दाखविलेल्या आहेत त्यात -

१) साडीची एक बाजू कमरेभोवती गुंडाळून तिच्या मिन्या बनवून त्या मिन्याचा खालचा भाग धरून पाठीमागे खोसला जात होता (नवार पध्दत) आणि साडीचा दुसरा भाग डाव्या हातावरून घेवून तोही एक टोक पाठीमागे खोसला जात होता.[१८]

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S
DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
Dist.Nanded

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Half Yearly | UGC Approved | ISSN : 2319 - 8648
Issue IX Vol II , May 2017 | Sr. No. 64310 | Impact Factor : 2.143

सालीपासून वस्त्र बनविणाऱ्यांना 'याग' असे म्हटले जात होते.[७] 'अंगविज्जा' ग्रंथात विविध धातूची वस्त्रे बनविली जात होती. असा उल्लेख आलेला आहे. त्यात लोहजालीक, सुवण्णपट्ट, सुवण्ण - खसित, वराखचिय इत्यादी वस्त्रे धातूची वस्त्रे होती. शिवाय वस्त्रांच्या किनार ह्या अलंकृत बनविल्या जात होत्या. त्यांच्यासाठी 'सकलदसद' व 'छिन्नदास' असे शब्दप्रयोग वापरले जात होते. शिवणकाम केलेल्या वस्त्रांचाही उल्लेख सापडतो ती वस्त्रे पांढरी, लाल, पिवळी, हिरवी, मोरपंखी रंगाची, गडद स्लेटी, दुहेरी रंगाची, (धुम्रछाय) गुलाबी रंगाची होती. म्हणजे तत्कालीन लोक रंगीबेरंगी वस्त्रे वापरीत होते. कपडे रंगविणाऱ्या लोकांना 'शुध्दरजक' असे संबोधले जात होते.[८]

कुषाणांच्या समकाळात ज्या ग्रंथांची रचना झाली त्यातूनही तत्कालीन वस्त्रशैलीची व वस्त्रप्रकारांची बरीच माहिती मिळते. साधारणत: तत्कालीन लोक धोती नेसत व शाल परिधान करीत होते. शालीने दोन कांधे झाकत होते. अश्वघोषने आपल्या 'सौदरनन्दकाव्य' ग्रंथात म्हटले की, तत्कालीन लोक वस्त्र आणि आभुषणांनी सजत होते. शिरोवस्त्र धारण करत होते त्याला 'मौली' असे नाव होते.[९] 'दिव्यावदान' ग्रंथात चमर्णी, दुन्दचेल या वस्त्रांचा उल्लेख आहे. त्याचबरोबर 'सणसाती' (पटोकोट) व 'प्रावार' वस्त्रांचाही उल्लेख आहे. तत्कालीन पुरूष मंडळी किनार असलेली विशेष प्रकारची वस्त्रे वापरीत होते. त्याच्याने पूर्ण शरीर झाकून घेत होते. असे वस्त्र साधारणत: राजे लोक वापरत होते.[१०] 'अंगविज्जा' ग्रंथात 'उत्तरीज' व 'अन्तरीज' वस्त्रांचा उल्लेख आहे यातील उत्तरीज (उत्तरीय) हे नाभीच्या वर तर अन्तरीज (अंतरीय) हे नाभीच्या खाली नेसले जाणारे वस्त्र होते. पुरूष मंडळी 'पटशाटक' (रेशमी धोती), क्षोम, दुगुल्लीया (दुकुल) चिनान्शुक, चिनपट्ट, प्रावार, शटक (धोती), श्वेतशाट (पांढरी धोती,) कोषेयपास (रेशमाची किनार असलेली धोती), पडा (चादर) उस्सीस (उष्णीष),वेप्पण (पेटयावरची पट्टी), कुपास (जॅकेट), कन्चुक, वारवाण (काहीसी वेगळी कंचुक), पल्लसाडग (लंगोट) इ. वस्त्रे परिधान करीत होते.[११] 'ललितविस्तार' ग्रंथानुसार त्याकाळात काशीमध्ये उत्पादीत झालेली वस्त्रे श्रेष्ठ मानली जात होती. उन्हाळयात गर्मीच्या काळात सुती वस्त्र परिधान केले जात होते. तसेच शिवलेली वस्त्रेही नेसली जात होती. त्यात प्रमुख कंचुक होते. विशेषकरुन योध्दा लोक कन्चुक नेसत होते.[१२] तत्कालीन उत्तम प्रतिची सुती व रेशमी वस्त्रे उच्च वर्गातील स्त्रि-पुरुष वापरत होते. तशी वस्त्रे बाजारांमध्ये दुकानातही विकत घेता येत होती. तसेच तशीच उत्तम प्रतिची वस्त्रे परदेशातही निर्यात केली जात होती. त्यातील रेशमी वस्त्रांवर विविध रत्ने व मौल्यवान खड्यांचे व सोन्याचे, चांदीचे वर्क केलेले आढळतात, अशा वस्त्रांना 'रत्नसुवर्ण प्रवारक' असे म्हटले जात होते.[१३] 'सौदरानन्दकाव्य' ग्रंथात उल्लेख आहे की तत्कालीन लोक स्वत:ला वस्त्राभुषणांनी सजवित होते. तसेच प्रसंगानुसारही वस्त्रे परिधान केली जात होती. म्हणजे आनंदी प्रसंग आणि शोकाकुल प्रसंगानुसार वस्त्रे वापरली जात होती. तत्कालीन लोक शोक प्रसंगाच्या समयी विशेषकरुन गेरू रंगाची वस्त्रे परिधान करीत होते. एरव्ही कोणत्याही रंगाची वस्त्रे परिधान केले जात होते. व त्या वस्त्रांना विविध सुगंधी द्रव लावून सुवासिक बनवून होसेने परिधान करीत होते.[१४]

वरील कुषाणकालीन वस्त्रे तत्कालीन लोक आपापल्या आर्थिक परिस्थीनुसार व आवडीनुसार वापरत होते. ते लोक विभीन्न रंगाची व तसेच शिवलेली वस्त्रेही वापरीत होते. तत्कालीन लोक धोती, शाल, उष्णीष ही वस्त्रे भिन्न - भिन्न शैलीनी परिधान करीत होते. त्या लोकांच्या धोतीची गाठ ही आकाराने मोठी असल्याचे दिसते. त्यावरून ती धोती अलंकृत असल्याकारणाने वजनदार असावी किंवा आकाराने लांब व रूंद असावी असे म्हणता येते. 'नाट्यशास्त्र' ग्रंथानुसार तत्कालीन लोक उष्णीष वापरत होते. पण ही उष्णीष उच्चवर्गीय लोकच जास्त करुन वापरत होते.[१५] 'अंगविज्जा' ग्रंथात उष्णीषला आलक, पट्टीका, वेढ्ढण (वेष्टण), सिसकरण इत्यादी नावानेही संबोधले आहे.[१६]

स्त्रियांची वस्त्रशैली

कुषाणकाळात स्त्रिया पायांच्या टाचेपर्यंत लांब पोहोचणारी साडी नेसत होत्या आणि मनगटापर्यंत लांब अशी कंचुक परिधान करीत होत्या. तसेच दोन्ही खांदे झाकून पुन्हा टाचेपर्यंत लटकणारी उत्तरीय धारण करीत होत्या. कधी - कधी उत्तरीयचे एक टोक कमरेतही खोसत होत्या. तर कधी त्या लांब सोडलेल्या उत्तरीयला कमरपट्याच्या आत बांधत होत्या. व उत्तरीयचा कमरेभोवती फुगा बनवत होत्या [१७] गांधार कलेतील स्त्रि मुर्त्यांमध्ये साडी नेसण्याच्या विभीन्न शैली दाखविलेल्या आहेत त्यात -

१) साडीची एक बाजू कमरेभोवती गुंडाळून तिच्या निऱ्या बनवून त्या निऱ्याचा खालचा भाग धरून पाठीमागे खोसला जात होता (नवार पध्दत) आणि साडीचा दुसरा भाग डाव्या हातावरून घेवून तोही एक टोक पाठीमागे खोसला जात होता.[१८]

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded



२) साडीचा एक भाग कमरेभोवती गुंडाळला जात होता त्याचा काष्टा बनवला जात होता आणि साडीचा दुसरा भाग खांद्यावर टाकून कमरेच्या वरच्या अंगाभोवती गुंडाळून त्याचा पदर समोर किंवा मागे सोडला जात होता.

३) साडी नेसण्याची आणखी एक शैली होती. त्यात कमरेभोवती नवारसारखी साडी नेसून संपूर्ण शरीर झाकत होते पण एक खांदा उघडा राहत होता आणि त्याचा पदर मागे सोडला जात होता.

४) कांही स्त्रिया गुडघ्याच्या वर साडी गुंडाळून काष्टा रूपात नेसत होत्या. आणि त्यावर कमरेभोवती कमरपट्टा बांधत होत्या किंवा एक मोठे लांब कापड गुंडाळा करून तो कमेरवर बांधत होत्या.[१९]

याशिवाय कांही स्त्रिया घाघरा किंवा लहेंगा नेसत होत्या. तत्कालीन गवळणी लहेंगा नेसत असल्याचे अनेक शिल्पात दाखविले आहे. मथूरा कलेतील जमालपूर येथे एक मातीची स्त्रिमुर्ती दाखविली आहे. तिच्या डोक्यावर कळशी आहे. त्या गवळणीलाही लहेंगा नेसलेले दाखविले आहे. गांधार कला शैलीतही अशा लहेंगा नेसलेल्या अनेक स्त्रिप्रतिमा दाखविलेल्या आहेत.[२०] कांही विदेशी स्त्रिप्रतिमाही आहेत त्यांनीही चुण्या असलेल्या घाघरा नेसलेला आहे. कुषाणकालीन एका नाण्यावर 'नना' देवीची प्रतिमा दाखविली आहे त्यावरही घाघऱ्यासारखे वस्त्र नेसल्याचे दाखविले आहे.[२१]

कुषाणकालीन कांही स्त्रिया कमरेपर्यंतचेही कंचुक धारण करीत होत्या. त्या काळात दोन प्रकारचे कंचुक धारण करण्याची पध्दती होती. एक कंचूक म्हणजे पूर्ण आस्तीन वाले (मनगटापर्यंत) आणि दुसरे कंचूक म्हणजे हाताच्या कोपऱ्यापर्यंतचे शॉर्ट अस्तीनवाले [२२] कुषाणकालीन 'नना' देवीला पूर्ण बाह्यांची कंचुक धारण केलेले प्रतिमांमध्ये दाखविले आहे. तशीच पूर्ण बाह्यांची कंचुक धारण केलेली एक स्त्रिप्रतिमा कौशाम्बी येथील उत्खननातही सापडली आहे. त्यात त्या स्त्रिचे कंचुक पाठीमागे टाचेपर्यंत लांब दाखविले तर तेच कंचूक पुढील बाजूला गुडघ्यापर्यंत लांब दाखविले आणि गुडघ्यावर ते कंचुक अर्धगोलाकार काटाचे दाखविले आहे.[२३] कांही शक तसेच इराणी स्त्रियांच्या अंगावर सुंदर असे वेलबुटीनी डिझाईन केलेले कंचूक नेसल्याचेही कांही शिल्पात दाखविले आहे. मथुरा कलाशैलीतील जमालपूर येथील स्तूपाची एक स्तंभ वेदीका आहे. जी लखनो येथील वस्तुसंग्रहालयात ठेवलेली आहे. त्यावर धुपदानी हातात धरलेली एक स्त्रीप्रतिमा दाखविली आहे. तीच्या अंगावर टाचेपर्यंत लांब अशी कंचुक नेसलेली दाखविली आहे. त्यावरून स्पष्ट होते की, कुषाणकाळात लांब असे कंचूक (गाऊनसारखी) नेसण्याची प्रथा होती. जमालपूर वेदीकेवरील ती प्रतिमा अतिशय आकर्षक आहे. तिच्या अंगावरील कंचुक 'पुष्पपट' नावाच्या वस्त्रापासून बनविले होते असे दिसते. तत्कालीन राजाचे स्त्रिअंगरक्षक घुडघ्यापर्यंतचे कंचुक नेसत होते.[२४]

कुषाणकालीन बहुतांश स्त्रिया डोक्यावर पदर घेत नव्हती. पण खांद्यावरुन लांब लटकणारे उत्तरीय मात्र धारण करीत होत्या. पाटलीपुत्र येथील एका स्त्रिमुर्तीमध्ये त्या स्त्रिने आपले उत्तरीय डोक्यावरुन घेऊन आपले कमरेवरील सर्व शरीर झाकून घेतलेले दाखविले. कांही सेवीका उष्णीष धारण केलेल्या दाखविल्या आहेत.[२५] कांही स्त्रिया भारी भरकम डिझाईन वर्क केलेले कापडांनी बनविलेले मुकूटही धारण करीत होत्या. कांही विदेशी स्त्रिया डोक्यावर लंबगोलाकार टोपी घातलेलीही दाखविली आहेत. कौशांबी येथील एका स्त्रिप्रतिमेच्या डोक्यावर अशीच टोपी दाखविली आहे. ते पाहिल्यावर असे वाटते को तिच्या डोक्यावर टोपीत हलकी रुई भरली की काय असे वाटत होते. कांही स्त्रिया आपल्या वक्षस्थली स्तनपट्टीही धारण करीत होत्या.[२६]

**पुरुषांची वस्त्रशैली -**

कुषाणकालीन पुरुष प्रामुख्याने धोती आणि उत्तरीय धारण करीत होते. तत्कालीन नाणे आणि शिल्पातील प्रतिमांवरुन पुरुष मंडळी विभीन्न शैलीचे धोती (काष्ट्याची किंवा लुंगीसारखी) नेसत होते. ती धोती कधी गुडघ्यापर्यंत तर कधी पायाच्या बोटापर्यंत नेसत होते. गांधार व मथुरा शैलीनुसार तत्कालीन शासक वर्ग आपल्या टाचेपर्यंत धोती नेसत होते. व उत्तरीयद्वारे आपले दोन्ही खांदे झाकून त्याच उत्तरीयची एक बाजू मागील बाजूला लटकती सोडत होते.[२७] नाण्यांवरही अशाच पुरुषप्रतिमा दाखविल्या आहेत. पुरुषांमध्ये

उत्तरीय धारण करण्याच्या अनेक शैली शिल्पांमध्ये दाखविल्या आहेत. उत्तरीयद्वारे कधी वक्षस्थल झाकले होते. तर कधी वक्षस्थल उघडेच होते. कांही मुर्तीमध्ये उजवा खांदा आणि वक्षस्थल उघडाच दाखविला आहे. मथुरा कलाशैली मध्ये पुरुष प्रतिमांवर धोती दाखविली आहे. त्या धोतीचा अधिकांश भाग कमरेभोवती गुंडाळलेला दाखविला आहे. आणि दोन मांडयामध्ये धोतीच्या मिऱ्या व धोतीची एक पट्टी सोडलेली स्पष्ट दिसते. कधी-कधी उत्तरीयचा एक भाग डाव्या खांद्यावरुन पाठीमागुन उजव्या हाताच्या कोपऱ्यावरुन गुडघ्यांना झाकला जात होता. [२८] उच्चवर्गीय पुरुष आपली धोती कमरेवर पक्की बांधून राहावी म्हणुन कमरबन्ध किंवा गुंडाळलेला कपडा वापरत होते. त्या कमरबंधचेही अनेक प्रकार होते.

कुषाणकाळात पुरुषमंडळी डोक्यावर अनेक प्रकारचे उष्णीषही धारण करत होते. लंबगोलाकार टोपीप्रमाणे डोक्यावर उष्णीष धारण केले जात होते. सिध्दार्थाच्या महाभिनिष्क्रमण समयी त्यांचा सारथी छंदकच्या हातात सिध्दार्थाची उष्णीष दाखविली आहे. ती उष्णीष वेलफुलांच्या अलंकृत वस्त्रानी बनविलेली होती. [२९] तत्कालीन उष्णीष साधे तसेच अलंकृत कापडांनी बनविलेले होते. त्या उष्णीषवर डिझाईनदार पट्टीही लावलेली असत. मातीच्या पुरुषमुर्तीमध्येही उष्णीषांच्या विवीध शैली दाखविलेल्या होत्या. ते उष्णीष मथुरा शैलीतील पाषाण मुर्तीवर असलेल्या उष्णीषासारखे वाटतात. [३०]

कुषाणकाळात पुरूष आपल्या डोक्यावर लंबगोलाकार टोप्याही वापरत होते. त्या टोपीच्या बुडाला अलंकृत कापडाची पट्टी गोटसारखी लावली जात होती. त्या टोपीच्या वरच्या शिर्ष टोकाला कांही तुरेही लावलेले असत. कांही वेळेस ती टोपी डोक्याला नाड्यांनी बांधून नाड्याचे नक्षीदार गोंडेवाले दोन टोक पाठीमागे सोडले जात होते. ह्या टोप्या अलंकृतही होत्या. अशा टोप्या कोशाम्बीच्या यक्ष आणि योध्दा पुरूषाच्या डोक्यावर दाखविल्या आहेत. टोप्यांचे अलंकरण मोती आणि विविध मौल्यवान खड्यांनीही केले जात होते. [३१] कुषाणकालीन नाण्यांवर शासकांच्या डोक्यांवर विविध प्रकारच्या टोप्या दाखविल्या. त्यात कांही लंबगोलाकार टोप्या होत्या तर कांही शिरस्त्राण असल्यासारखे वाटतात. कुषाण कालीन मातीच्या अनेक प्रतिमांमध्ये टोप्या दाखविल्या आहेत. त्यात अधिकांश लहान मुलांच्या प्रतिमा आहेत. त्यावरून असे वाटते की कुषाणकाळात उष्णीष वापरण्याची प्रथा हळू हळू कमी झाली व लंबगोलाकार टोप्या आणि शिरस्त्राण वापरले जाऊ लागले.

कुषाणकाळात पुरूषमंडळी कंचुक (खमीज) नेसत होते. ज्याची कमरेखालील उजव्या आणि डाव्या बाजूला गुडघ्याच्या वर दोन्ही बाजुला चिरे पाडलेले असत (ओपन शर्टसारखे ) हे कंचूक पूर्ण बाह्यांचे तर कांही कोपन्यापर्यंतच्या बाह्यांचे होते [३२] तत्कालीन राजा आणि राजकुमारांचे कंचुक मौल्यवान होते. त्यावर पुष्पाचे व इतर अनेक डिझाईन काम केलेले होते. याशिवाय त्यावरील वेगवेगळ्या डिझाईन मध्ये मौल्यवान खडे व सोन्या - चांदीचे वर्क केलेले असायचे. तर साधारण लोक साधे कंचूक धारण करीत होते. [३३] कांही पुरूष पायजमा सारखे वस्त्र व घाघरासारखे वस्त्रही धारण करीत होते. तर कांही पायजमे सलवारसारखेही होते. कांही पुरूष धोतींच्या मिन्यावर एक पट्टीका लावत होते. ती पट्टीका नाभीजवळ खोसली जाऊन दोन्ही पायांच्या मध्ये लटकत होती. [३४]

अशाप्रकारे कुषाणकालीन स्त्रि - पुरुष आपल्या वेशभुषेसाठी विशेष आहे कारण त्या वेशभुषेवर ग्रीकांच्या, पार्शियाच्या वेशभुषेचा प्रभाव दिसतो. त्यांची उष्णीष धारण करण्याची पध्दती अगदी भिन्न असल्याचे दिसते ख्रिसमच्या सांतासारखी टोपी त्यांच्या डोक्यावर दिसते. तसेच विभीन्न असे फेटे बांधले जात होते. ते अलंकृत होते. स्त्रियांच्या साड्या व कंचुक नेसण्याच्या पध्दतीवरही ग्रीक प्रभाव स्पष्टपणे दिसतो. म्हणून तर कुषाणकालीन गांधार शैली आणि मथूरा शैली ह्या कलेच्या क्षेत्रात स्वतंत्र व वैशिष्ट्यपूर्ण शैली म्हणून ओळखल्या जातात.

१) इतिहास - बी. डी. शिंदे, पृ. १२७
२) दिव्यावदान - संपादक, पी.एल. वैद्य, दरभंगा, १९५९, पृ. १७०-७१
३) अंगविज्जा - संपादक, श्री पुण्यविजय, अध्याय - २८, पृ १६०
४) उपरोक्त, अध्याय ०९, पृ. १८०
५) उपरोक्त, अ. २८ पृ. १६१
६) प्राचीन भारतीय वेशभुषा, मोतीचंद्र, प्रयाग, पृ.९७-९८
७) ललितविस्तार, संपादक, पी.एल. वैद्य, पृ. १५३,१८३
८) पुर्वोक्त - ३, अ.३१ पृ. १६०,१६३-१६४
९) अश्वघोषाचे - सौन्दरनन्दकाव्य, संपादक, महामहोपाध्याय हरप्रसाद शास्त्री, पृ.५,७,८,४८
१०) पुर्वोक्त - ६, पृ. १०२
११) पुर्वोक्त - ३, अ. २८, पृ. १६०
१२) पुर्वोक्त - ७, पृ. ८३,२०३,३१२
१३) पुर्वोक्त - २, पृ. १९६,३१६
१४) पुर्वोक्त - ९, पृ. २३, २६, ३०, ४८, ५३
१५) नाट्यशास्त्र (भरतवृत्त) संपा, एम.घोष, कलकत्ता, १९६७, अ.८, पृ. १२
१६) पुर्वोक्त - ३, अ. ३१, पृ. १६४
१७) कॅटलॉग ऑफ दि आर्कियालॉजिकल म्युझीयम ऑफ मथूरा, जे.पी.एच. वोगल.



Saraswati? ... Vyapari Education Society's ... College, Degloor, Dist. Nanded

# CURRENT GLOBAL REVIEWER

Half Yearly
Issue IX Vol II , May 2017
UGC Approved
Sr. No. 64310
ISSN : 2319 - 8648
Impact Factor : 2.143

१८) ल आर्ट ग्रिको बुध्दीक दु गन्धार, पुसे. ए. - भाग - २, आकृती ३१९
१९) भारत कला भवन - वाराणसी, स्त्रिशिल्प
२०) उपरोक्त - १८, भाग - २, पृ. ३४२ - ४३
२१) क्टलॉग ऑफ क्वाईन्स, पटना वस्तुसंग्रहालय, फलक - १७,१३३
२२) ऑर्कियोलॉजिकल सर्वे ऑफ इंडिया, अॅन्युअल रिपोर्ट, १९१५ - १६, फलक - ०५ व ०९
२३) टेरिकोटा फिगर्स ऑफ कौशांबी, अलाहाबाद, आकृती ५८-५९
२४) पुर्वोक्त - ६, पृ. १४४
२५) दि जैन, स्तुप अॅन्ड अदर एन्टीक्वीटीज ऑफ मथुरा, फलक ३४-३५
२६) टेराकोटा फिगर्स फ्रॉम कौशांबी, काला. एस.सी., अलहाबाद, आकृती ५५
२७) पुर्वोक्त - १८, भाग - २, आकृती ३९३, ४१७
२८) पुर्वोक्त ६, आकृती - १२, पृ. ६४
२९) पुवोक्त - १८, भाग - २, आकृती - ३९३,४१७
३०) इंडीयन कॉसच्युम कॉयफर अॅन्ड ऑर्नामेंटस - सच्चीदानंद, सहाय, पृ. ६४
३१) ल स्कल्पचर दि बोधगया - वोगल जे.पी.एल., फलक - ४
३२) लखनौ वस्तुसंग्रहायल, आकृती २०८
३३) उपरोक्त, आकृती - ३
३४) कॅटलॉग ऑफ द क्वाईन्स इन दी पंजाब म्युझीयम, फलक १४,१५१

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded